तरुण भारत संवाद
मंगळवार, ९ डिसेंबर २०२५

# डॉ. आंबेडकर यांचे देश उभारणीत महत्त्वाचे योगदान : डॉ. काळेबाग

प्रतिनिधी

कोल्हापूर

आपण सर्व एक आहोत, ही भावना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाच्या मनात बिंबवली. शेतकऱ्यांसाठीचा सर्वात मोठा मोर्चा डॉ. आंबेडकर यांनी काढला. ज्या देशाची शेती व उद्योगधंदे विकसित असतात, त्याच देशाची प्रगती होते, हे ओळखून डॉ. आंबेडकरांनी वित्त आयोग, जल आयोग, ऊर्जा आयोग स्थापन करुन देशाला समृध्द करण्यावर भर दिला. शिक्षणाला विकासाचे माध्यम मानत नवभारताच्या निर्मितीची दृष्टी निर्माण केली, देश उभारणीत डॉ. आंबेडकर यांचे योगदान महत्वाचे आहे. त्यांचे विचार विद्यार्थ्यांनी अंमलात आणून बाबासाहेबांच्या स्वप्नातील भारत घडवावा, असे प्रतिपादन भोगावती महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख, डॉ. विजय काळेबाग यांनी केले.

ते विवेकानंद कॉलेज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी आयोजित 'आधुनिक भारताच्या निर्मितीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान' यावर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे होते.

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास ज्युनिअर, सिनिअर कॉलेजचे स्टाफ सेक्रेटरी, एस. के. धनवडे, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

### विचारांचा जागर करावा

गावडे यांनी, मानवतेचे प्रतिक म्हणून डॉ. आंबेडकर यांना ओळखले जाते. समाजातील जातीयता नष्ट करण्याचे महत्वपूर्ण कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. युवा पिढीने जयंती, महापरिनिर्वाण दिन या दिवशी व्यसनाधिनता टाळून या महापुरुषांच्या विचारांचा जागर करावा, असे आवाहन केले.